सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ८२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ६ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# भाजपची बंगालनंतर आता महाराष्ट्रावर नजर SIR वर लक्ष केंद्रित

## मराठी मुलूख जिंकण्यासाठी सर्व लहानथोर कार्यकर्त्यांना देणार प्रशिक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मुंबई** – पश्चिम बंगालमधील ऐतिहासिक विजयानंतर भाजपने आता आपला मोर्चा महाराष्ट्राकडे वळवला आहे. भाजपने बंगालमध्ये एसआयरच्या जोरावर विजय मिळवल्याचा दावा केला जात आहे. आता हीच रणनीती भाजप महाराष्ट्रात राबवण्याची शक्यता आहे. यासाठी मराठी मुलूखावरील आपली पकड अधिक मजबूत करण्यासाठी भाजपने आपल्या सर्वच स्तरांवरील कार्यकर्त्यांना विशेष प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे.

भाजपचा मागील १५ वर्षांपासून पश्चिम बंगालचा गड सर करण्याचा प्रयत्न सुरू होता. त्यात त्यांना यंदा ऐतिहासिक यश मिळाले. भाजपच्या या यशात साम-दाम-दंड-भेद असे सर्वच घटक कारणीभूत ठरले. पण निवडणूक आयोगाच्या विशेष मतदार पुनरावलोकन (एसआयआर) मोहिमेचा भाजपला बंगालमध्ये मोठा फायदा झाला. आता भाजप महाराष्ट्रातही हाच कित्ता गिरवणार आहे. भाजपने आज दादरच्या वसंतस्मृती कार्यालयात एका कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेत एसआयआरच्या मुद्यावर कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.



**सर्वच लहानथोर नेत्यांना मिळणार प्रशिक्षण**

प्रस्तुत कार्यशाळेत भाजपने एसआयआरच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी एक कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्यात नेत्यांकडून भाजप पदाधिकाऱ्यांना सक्त सूचना देण्यात आल्या. पदाधिकारी प्रशिक्षणानंतर भाजप आपल्या लोकप्रतिनिधींनाही प्रशिक्षण देणार आहे. पंचायत समिती सदस्य, नगरसेवक व जिल्हा परिषदेच्या सदस्यांना विभागीय पातळीवर प्रशिक्षण दिले जाईल. त्यानंतर टप्प्याटप्प्याने आमदार, खासदार व मंत्र्यांना एसआयआर मोहिमेसाठी प्रशिक्षित केले जाईल. अंतिम टप्प्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या प्रकरणी आमदार व खासदारांना मार्गदर्शन करतील.

भाजपच्या या खास मोहिमेचा २०२९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीवर मोठा परिणाम पडण्याची शक्यता आहे. विशेषतः या घटनाक्रमामुळे भाजप २०२९ च्या निवडणुकांना स्वबळावर सामोरे जाणार काय? अशी चर्चाही राजकीय वर्तुळात रंगली आहे.

भाजपत बुथ प्रमुख हा पक्षाचा, देशाचा अध्यक्ष होऊ शकतो. आमचा पक्ष घराणेशाहीवर चालत नाही. ज्याच्यात क्षमता आहे, तोच या ठिकाणी मोठा नेता होतो. आम्ही हे सिद्ध केले आहे की, या देशात घराणेशाही चालणार नाही. त्यामुळे तुम्हाला परफॉर्मन्स दाखवावाच लागेल.

### अमित शहांनी गतवर्षी दिले होते स्वबळाचे संकेत

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गतवर्षी महाराष्ट्रात भाजपला कोणत्याही कुबड्यांची गरज नसल्याचे सूचक विधान केले होते. तेव्हापासून राज्यात भाजप २०२९ ची निवडणूक आपल्या मित्रपक्षांना बाजूला सारून स्वबळावर लढणार काय? अशी चर्चा सुरू झाली होती. अमित शहा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे रणशिंग फुंकताना म्हणाले होते, भाजप आता कुणाच्या कुबड्या घेऊन चालणारा पक्ष नाही. हा स्वबळावर चालणारा पक्ष आहे. त्यामुळे आता डबल इंजिन सरकार नको, तर ट्रिपल इंजिन सरकार हवे आहे. आगामी निवडणुकीत असे लढा की, विरोधकांचा सुपडासाफ झाला पाहिजे. विरोधक दुर्बिण लावूनही सापडता कामा नये.

# ममता बॅनर्जी मुख्यमंत्रिपद सोडत नसतील तर लाथ मारुन बाहेर काढा; महेश जेठमलानी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६कोलकाता** – पश्चिम बंगालमध्ये जी निवडणूक पार पडली त्याचा निकाल ४ मे रोजी जाहीर झाला. भाजपाने २०७ जागा मिळवत तृणमूल काँग्रेसला धोबीपछाड दिला. ममता बॅनर्जी यांना भवानीपूरमध्येही जिंकता आलेलं नाही. दरम्यान ममता बॅनर्जी यांनी पत्रकार परिषद घेतली आणि निवडणूक निकाल मान्य नाही असं म्हटलं आहे. तसंच मुख्यमंत्रिपद सोडणार नाही असंही जाहीर केलं आहे. ज्यानंतर वरिष्ठ कायदे तज्ज्ञ महेश जेठमलानी यांची संतप्त प्रतिक्रिया समोर आली आहे.

ममता बॅनर्जींना लाथ मारुन हाकलून दिलं पाहिजे. मला ठाऊक आहे की हा अपमान आहे, पण ममता बॅनर्जींचा हा अपमान झालाच पाहिजे. राज्यपाल त्यांच्याकडे राजीनामा मागू शकतात. पण मला वाटतं की राज्यपालांनी त्यांची हकालपट्टी केली पाहिजे आणि त्यांचा जो काही माज आहे तो उतरवला पाहिजे अशी संतप्त प्रतिक्रिया महेश जेठमलानी यांनी दिली आहे. ममता बॅनर्जींना धडा शिकवायचा असेल तर त्यांना अपमान करुनच हाकलून दिलं पाहिजे असंही महेश जेठमलानी यांनी म्हटलं आहे.



महेश जेठमलानी म्हणाले, ममता बॅनर्जींना त्यांच्या पदाचा गर्व झाला होता. त्यांची हकालपट्टी केली पाहिजे असं म्हटलं आहे. महेश जेठमलानी यांनी एनडीटीव्हीशी संवाद साधला त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केलं आहे. ममता बॅनर्जी या पदावर राहणारच यावर हटून बसल्या तर राज्यपालांनी त्यांच्या घरी पोलीस पाठवावेत आणि त्यांना सरकारी निवासस्थानातून बाहेर काढावं. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात त्यांनी जाणं ही बाबही आता बेकायदेशीर आहे. निवडणुकीचा निकाल लागला आहे त्यामुळे आता ममता बॅनर्जी मुख्यमंत्री म्हणून त्या ठिकाणी जाऊ शकत नाहीत असंही महेश जेठमलानी यांनी म्हटलं आहे.

# 'शासकीय कर्मचाऱ्यांच्या हिंदी भाषा परीक्षेला स्थगिती' – मंत्री उदय सामंत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मुंबई–** महाराष्ट्र सरकारच्यावतीने शासकीय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी २८ जूनला हिंदी भाषेची परीक्षा घेण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. या घोषणेमुळे राजपत्रित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ही परीक्षा द्यावी लागणार होती. मात्र, राज्य सरकारच्या या निर्णयानंतर शिवसेना ठाकरे गट, मनसे आणि इतर काही संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा मराठी विरुद्ध हिंदी भाषा वादाला तोंड फुटण्याची शक्यता होती.




या घडामोडीनंतर आता शासकीय कर्मचाऱ्यांची घेण्यात येणाऱ्या हिंदी भाषेच्या परीक्षेला स्थगिती देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या संदर्भातील माहिती मंत्री उदय सामंत यांनी आज माध्यमांशी बोलताना दिली आहे. महाराष्ट्रात मराठी भाषा असताना हिंदी भाषेची सक्ती का? यामागील कारण काय? असे अनेक सवाल विचारले जात होते. त्यानंतर अखेर सरकारने शासकीय कर्मचाऱ्यांच्या हिंदी भाषा परीक्षेला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. मला माध्यमांमधूनच कळलं की मराठी भाषा संचालनालयाकडून अशा प्रकारची परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यानंतर मी आता आमचे प्रधान सचिव किरण कुलकर्णी यांच्याशी चर्चा केली. हिंदी भाषेची परीक्षा घेण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, आता त्या परीक्षेला स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी सांगितली आहे.

भविष्यात हिंदी भाषेची परीक्षा आवश्यक आहे का? हे मी राज्याचा मराठी भाषेचा मंत्री म्हणून स्वत: पडताळून पाहणार आहे. त्यानंतर जर ही परीक्षा आवश्यक असेल तर ही परीक्षा घेऊ, अन्यथा जर ही परीक्षा आवश्यक नसेल तर ही परीक्षा न घेण्याचा निर्णय आम्ही घेणार आहोत, असं मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केलं आहे.

# आता टोल नाक्यावर मिळणार ताजी भाजी:राज्यभरात उभारले जाणार 'कृषी मॉल'

## सार्वजनिक बांधकाम विभागाचा मोठा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६मुंबई–** राज्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या शेतमालाला थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य सरकारने एक अभिनव योजना आखली आहे. राज्यातील सर्व प्रमुख रस्ते आणि महामार्गांवरील टोल नाक्यांच्या परिसरात आता सुसज्ज 'कृषी मॉल' उभारण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना आपला माल विकण्यासाठी लांबच्या बाजारपेठांवर अवलंबून राहावे लागणार नाही, तर महामार्गावरून प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना थेट शेतातून आलेली ताजी फळे आणि भाजीपाला खरेदी करता येणार आहे.

अनेकदा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल कृषी उत्पन्न बाजार समिती किंवा शहरांमधील बाजारपेठेत नेण्यासाठी मोठा वाहतूक खर्च करावा लागतो. तसेच प्रवासात बराच वेळ आणि श्रम वाया जातात. आता टोल नाक्यांवरच विक्रीची सोय उपलब्ध झाल्याने, शेताच्या जवळच हक्काची बाजारपेठ मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचा वाहतूक खर्च शून्यावर येईल आणि नफ्यात वाढ होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.




महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अनेकदा दर्जेदार आणि ताजी फळे किंवा भाजीपाला मिळत नाही. मात्र, या कृषी मॉल्समुळे प्रवाशांना मध्यस्थांशिवाय थेट शेतकऱ्यांकडून माल घेता येईल. कोणत्याही मध्यस्थाचा हस्तक्षेप नसल्यामुळे बाजारपेठेच्या तुलनेत येथे शेतमाल स्वस्त दरात मिळण्याची शक्यता आहे. यामुळे ग्राहकांच्या खिशालाही दिलासा मिळणार आहे.

**आठवडी बाजारानंतरचे मोठे पाऊल**

यापूर्वी राज्यात शहरांमध्ये 'थेट शेतकरी ते ग्राहक' हा आठवडी बाजाराचा प्रयोग यशस्वी झाला होता. त्याच धर्तीवर आता महामार्गावरील ही नवीन बाजारपेठ शेतकऱ्यांसाठी क्रांतीकारी ठरू शकते. सार्वजनिक बांधकाम विभागाने या मॉल्सच्या बांधकामासाठी हालचाली सुरू केल्या असून, लवकरच प्रत्येक टोल नाक्यावर ही सुविधा कार्यान्वित केली जाणार आहे.

# निवृत्तीवेतन योजना अखेर जाहीर

## महाराष्ट्र शासनाचा मोठा निर्णय

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.६अमरावती–** राज्यातील कर्मचाऱ्यांना कोणती निवृत्तीवेतन योजना लागू होणार, याबाबत संदिग्ध स्थिती होती. नुकत्याच झालेल्या राज्य सरकारी कर्मचारी व शिक्षक संघटनाच्या संपात याविषयी मागणी रेटण्यात आली होती. तसेच जुनी निवृत्ती वेतन योजना लागू होणार नाही, हे सुद्धा शासनाने स्पष्ट केले होते. त्याचवेळी सुधारित योजनेबाबत लवकरच आदेश काढण्याची हमी दिली होती. अखेर बुधवारी त्यावर महाराष्ट्र शासनाने आदेश काढला आहे.



**सुधारित योजना–** राज्य शासनाने राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली (छझड) अंतर्गत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी 'सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना' लागू करण्याची सविस्तर कार्यपद्धती एका शासन परिपत्रकाद्वारे जाहीर केली आहे. या निर्णयामुळे १ मार्च २०२४ पासून सेवेत असलेल्या आणि या योजनेचा पर्याय निवडणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या योजनेनुसार, ज्या कर्मचाऱ्यांची सेवा २० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त झाली आहे, त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५०% निवृत्तिवेतन आणि त्यावरील महागाई वाढ लागू होईल. १० ते २० वर्षांच्या दरम्यान सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवेच्या प्रमाणात निवृत्तिवेतन दिले जाईल. या योजनेअंतर्गत किमान निवृत्तिवेतन ७,५०० रुपये निश्चित करण्यात आले असून, १० वर्षांपेक्षा कमी सेवा असलेल्यांना हे निवृत्तिवेतन लागू होणार नाही.पात्र आणि इच्छुक कर्मचाऱ्यांनी या सुधारित योजनेत सहभागी होण्यासाठी आपला पर्याय ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत संबंधित कार्यालय किंवा विभाग प्रमुखांकडे सादर करणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे, ज्या कर्मचाऱ्यांनी यापूर्वी छझड मधून काही रक्कम काढली असेल, त्यांना ती रक्कम १०% व्याजासह परत करावी लागेल. अन्यथा त्यांच्या निवृत्तिवेतनात त्याच प्रमाणात कपात केली जाईल.

# मेळघाटातील आरोग्य व्यवस्थेला दिलासा देण्यासाठी अचलपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** मेळघाटातील कोलमडलेल्या आरोग्य व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर अचलपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची जोरदार मागणी आमदार बच्चू कडू यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व आरोग्यमंत्र्यांकडे लेखी स्वरूपात केली आहे. दुर्गम भागातील नागरिकांना वेळेत उपचार मिळत नसल्याने होणारे मृत्यू, गर्भवती महिलांचे हाल आणि बालकांच्या जीवावर बेतणारी परिस्थिती लक्षात घेता ही मागणी करण्यात आली आहे.

आमदार कडू यांनी निवेदनात नमूद केले की, अमरावती शहरात आधीपासूनच मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत. शासकीय व खाजगी वैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये आणि हजारो बेडची क्षमता येथे आहे. विविध वैद्यकीय महाविद्यालयांमधून दरवर्षी शेकडो विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो, तर शहरातील रुग्णालयांमध्ये हजारो बेडची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे अमरावतीत आरोग्य सेवा मोठ्या प्रमाणावर विकसित झाल्या आहेत.

मात्र दुसरीकडे मेळघाट आणि अचलपूर परिसरातील आरोग्य व्यवस्था अत्यंत बिकट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अनेक गावांमध्ये डॉक्टर, औषधे आणि रुग्णवाहिका उपलब्ध नाहीत. रुग्णांना १५० ते २०० किलोमीटरचा खडतर प्रवास करून अमरावती गाठावी लागते. या प्रवासादरम्यान अनेक रुग्णांचा मृत्यू होत असल्याच्या घटना घडत आहेत.

गर्भवती महिलांना वेळेत उपचार मिळत नाहीत, आजारी बालकांना कडेवर घेऊन डोंगर-दऱ्यांतून प्रवास करावा लागतो, तर वृद्ध रुग्ण उपचाराअभावी घरातच वेदना सहन करत पडून राहतात. कुपोषण, बालमृत्यू आणि मातामृत्यूचे वाढते प्रमाण ही त्या भागातील गंभीर समस्या असल्याचेही त्यांनी नमूद केले.



अचलपूर हे भौगोलिकदृष्ट्या चांदूरबाजार, अंजनगाव, दर्यापूर, धारणी व चिखलदरा या भागांसाठी केंद्रबिंदू असल्याने येथे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणे अत्यंत उपयुक्त ठरेल. तसेच येथे मोठ्या प्रमाणात शासकीय जमीन उपलब्ध असून भविष्यात स्वतंत्र जिल्हा म्हणून विकसित होण्याची क्षमता असल्याचेही कडू यांनी सांगितले.सध्या अचलपूर तालुक्यात केवळ १५० ते २०० बेडचीच सुविधा उपलब्ध असून त्याच्या तुलनेत अमरावतीत ३५०० पेक्षा अधिक बेडची सुविधा आहे. त्यामुळे आरोग्य सुविधांचे असमतोल वितरण स्पष्ट दिसून येत असल्याचे त्यांनी नमूद केले.अमरावतीत आधीच मोठ्या प्रमाणावर सुविधा आहेत, मात्र मेळघाटातील लोक आजही उपचारासाठी तडफडत आहेत. अचलपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन झाल्यास हजारो गरीब व आदिवासी नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असे कडू यांनी म्हटले आहे. दरम्यान, मेळघाट संघर्ष यात्रेदरम्यान महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री प्रकाश आंबेडकर यांनी मेळघाट दौऱ्यात आरोग्य समस्यांचा निपटारा करण्याचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनांची पूर्तता होत असल्याचे या मागणीमुळे दिसून येत असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

शासनाने या गंभीर व मानवतावादी प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन अमरावती येथे प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अचलपूर येथे स्थानांतरित करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## संपादकीय ......

# नव्या राजकारणाची सुरुवात

*पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालांतून भारतीय मतदार अधिक जागरूक, परिपक्व आणि विकासाभिमुख झाल्याचे दिसते. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल पाहता भारतीय मतदार दिवसेंदिवस चोखंदळ, चिकित्सक आणि निर्णयक्षम होत आहे, या सत्याची प्रचिती येते. या निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी ९० टक्क्यांच्या पुढे पोहोचली. हे सुजाण दृष्टीचे, प्रगल्भतेचे प्रतीक होय. या निकालांमध्ये एक समान धागा आहे तो म्हणजे, मतदारांच्या बदलत्या आकांक्षा, त्यांची परिपक्वता आणि विकासाबाबत वाढत असणारी जागरूकता. या तिन्ही गोष्टी भारतीय लोकशाहीला बळकटी देणार्या आहेत. सत्ता ही आपली मक्तेदारी नाही, मनमानी कारभार जनता आता सहन करणार नाही, हा संदेश या निकालांनी राजकीय नेत्यांना पुन्हा एकदा दिला आहे.*

*सातत्याने तीन वेळा सत्तेवर असलेल्या ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसच्या सत्तेविरोधात अँटी इन्कम्बन्सी भावना निर्माण होणे अपरिहार्य होते. शिवाय त्यांच्या पक्षातील अभिजन वर्गाची मक्तेदारी, उच्च स्तरावरील राजकीय गैरव्यवहार आणि मागील कालखंडात बिघडलेली कायदा-सुव्यवस्था, महिलांवर झालेले अन्याय-अत्याचार यामुळे बंगालमधील मतदार असंतुष्ट होते. भाजपने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली जोरदार प्रचार मोहिमांची आखणी करत लोकांपर्यंत सामाजिक कल्याणकारी विकास कार्यक्रम नेले. देशाच्या इतर राज्यात होत असलेल्या सर्वांगीण प्रगतीचे चित्र पाहून बंगाली नागरीकांनाही कृषी, उद्योग, शिक्षण, आरोग्य, ऊर्जा, सुरक्षा या सर्व बाबतीत काही रचनात्मक व ठोस घडावे, अशी अपेक्षा होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे बंगालमधील जनतेने डबल इंजिन सरकारच्या दिशेने कौल दिला. भाजपचा गड असलेल्या उत्तर बंगालपेक्षाही दक्षिण बंगालमध्ये अधिक जोरदार मुसंडी मारत भाजपने मतदारांना आपल्याकडे खेचण्यात यश मिळवले. त्यामुळे हे विक्रमी यश प्राप्त होऊ शकले. बंगालमध्ये भारतीय जनसंघाचे संस्थापक पंडित श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी भारताच्या मंत्रिमंडळात उद्योगमंत्री म्हणून काम पाहिले होते. त्यांनी जम्मू-काश्मीरच्या विलीनीकरणासाठी काश्मीरमध्ये सत्याग्रह केला होता; पण कारावासात त्यांचा मृत्यू झाला होता. ताज्या निकालांनी बंगाली मतदारांनी त्यांना न्याय दिला, असे म्हणावे लागेल. निवडणूक आयोगाच्या सतर्कतेमुळे बंगालमध्ये निवडणूकपूर्व आणि निवडणुकोत्तर काळात हिंसाचाराचा मागमूसही दिसून आला नाही. त्यामुळेच यंदा मतदानाची टक्केवारी वाढलेली दिसून आली. हिंदुत्वाच्या मुद्द्याने बंगालच्या मातीत घेतलेली ही पकड भविष्यातील राजकारणाची दिशा ठरवणारी ठरणार आहे.*

*तामिळनाडूच्या राजकीय इतिहासात यंदाच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल सुवर्णअक्षरांनी लिहिले जातील. दशकानुदशके ज्या द्रविड राजकारणाच्या गडाला कोणीही धक्का लावू शकले नाही, तो ७७ वर्षे जुना द्रमुकचा किल्ला अवघ्या दोन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या 'तमिळगा वेत्री कळघम' या पक्षाने भुईसपाट केला. 'थलपती' म्हणून ओळखला जाणारा अभिनेता सुपरस्टार विजयने रुपेरी पडद्याबरोबरच राजकीय रणांगणातही ताकद सिद्ध करत तामिळनाडूमध्ये एका नव्या युगाचा श्रीगणेशा केला. या विजयाने टीव्हीकेने राजकीय विलेषकांचे सर्व आडाखे मोडीत काढले. तामिळनाडूमध्ये चित्रपट आणि राजकारण हे एकमेकांपासून वेगळे करता येत नाहीत. सी. एन. अण्णादुराई, एम. करुणानिधी, एम. जी. रामचंद्रन आणि जयललिता या सर्वांनी रुपेरी पडद्याच्या माध्यमातून मिळालेल्या 'स्टारडम'चे रूपांतर सत्तेत केले होते. मात्र, गेल्या काही वर्षांत तमिळ जनतेला एका नव्या आणि तरुण नेतृत्वाची प्रतीक्षा होती. विजयने नेमकी हीच पोकळी ओळखून 'तमिळगा वेत्री कळघम'ची स्थापना केली. त्याने केवळ ग्लॅमरवर विसंबून न राहता बूथ स्तरावर कार्यकर्त्यांचे जाळे विणले. पहिल्यांदा मतदान करणार्या तरुणांनी 'टीव्हीके'ला बदलाचा पर्याय म्हणून स्वीकारले. माजी मुख्यमंत्री दिवंगत जयललिता यांच्यानंतर अण्णा द्रमुकमध्ये निर्माण झालेली नेतृत्वाची पोकळी भरून काढण्यात 'टीव्हीके' यशस्वी ठरला. अण्णाद्रमुकचा पारंपरिक मतदार मोठ्या प्रमाणावर विजयकडे वळल्याचे चित्र दिसत आहे. द्रमुक हा राजकीय शत्रू आहे आणि भाजप हा वैचारिक शत्रू आहे, ही विजयची स्पष्ट भूमिका तमिळ अस्मितेचा अभिमान बाळगणार्या मतदारांना भावली. शिवाजी गणेशन किंवा कमल हासन यांच्याप्रमाणे करिअरच्या उतरत्या काळात नव्हे, तर यशाच्या शिखरावर असताना विजयने राजकारणात उडी घेतली आणि सी. एन. अण्णादुराई आणि एमजीआर यांच्या पावलावर पाऊल ठेवून तामिळनाडूच्या राजकारणात इतिहास घडवला. हा 'नवा सेनापती' आता तामिळनाडूला कोणत्या दिशेने घेऊन जातो, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.*

*आसाम विधानसभा निवडणुकीत भाजपने मिळवलेला विजय हा विकासकामांवर आणि सांस्कृतिक अस्मितेच्या मुद्द्यावर मतदारांनी दिलेली सकारात्मक पावती म्हणावा लागेल. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने सलग तिसर्यांदा सत्ता राखत आपला गड अधिक मजबूत केला. सीमारेषा सुरक्षा, पायाभूत सुविधांचा विकास आणि स्थानिक समुदायांच्या हक्कांचे संरक्षण या मुद्द्यांना आसामच्या जनतेने भरभरून दाद दिली.*

*पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशातही भाजपने मित्रपक्षांसह मिळवलेला विजय हा दक्षिण भारतात पाय रोवण्याच्या त्यांच्या रणनीतीचा एक भाग ठरला आहे. येथील स्थानिक प्रशासनातील सुधारणा आणि केंद्र सरकारकडून मिळणारा निधी यामुळे मतदारांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले होते.*

*केरळमध्ये यंदाच्या निकालांनी मोठी उलथापालथ घडवून आणत डाव्यांची सत्ता उलथवून टाकली आहे. तब्बल १० वर्षांनंतर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीने (यूडीएफ) जोरदार पुनरागमन केले आहे. भ्रष्टाचाराचे आरोप आणि प्रशासकीय त्रुटी यांसारख्या मुद्द्यांवरून मतदारांनी विजयन सरकारला नाकारल्याचे दिसते. काँग्रेसचे व्ही. डी. सतीशन यांच्या नेतृत्वाखालील संघटित प्रचार आणि राहुल गांधी यांनी दिलेल्या बळामुळे यूडीएफला सर्व स्तरांतील मतदारांपर्यंत पोहोचण्यात यश मिळाले आहे. भाजपने यावेळेस केरळमध्ये ऐतिहासिक कामगिरी नोंदवत चतनूर, नेमम आणि कझाकुट्टम यांसारख्या मतदारसंघात विजय मिळवला आहे. या विजयामुळे केरळच्या राजकारणात तिसर्या शक्तीचा उदय होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.*

# खर्च वाढीचा फटका; सोयाबीन-ज्वारी बियाणे महाग, कापूस दर स्थिर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती**

यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना खतटंचाई व दरवाढीसोबतच सोयाबीन आणि ज्वारीच्या बियाण्यातील दरवाढीचाही सामना करावा लागणार आहे. सोयाबीनच्या दरांमध्ये प्रति बॅग ५५० ते ६६० रुपये तर, ज्वारीच्या किंमतीत ३० रुपयांनी वाढ झाली आहे. तूर, मूग आणि उडदाच्या किमती मात्र स्थीर असून कापसाच्या बियाण्यामध्येही यंदा वाढ झालेली नाही. महाबीजने या किमती जाहीर केल्या असून आता खासगी कंपन्यांचे दर यावर आधारित राहणार आहेत. खरीप हंगामाच्या पूर्वतयारीस प्रारंभ झाला असून शेतकऱ्यांनी खत व बियाण्यांची जुळवाजुळव सुरू केली आहे. युरिया व डीएपीच्या विक्रीवर मर्यादा आणण्यात आली असल्याने शेतकऱ्यांची कोंडी झाली असतानाच बियाण्यातील दरवाढही अडचणीची ठरणारी आहे. अमरावती जिल्हा कोरडवाहू पट्टा असून खरीप हंगामात सोयाबीन, कापूस व तूर ही या हंगामातील महत्त्वाची व मुख्य पिके आहेत. जिल्ह्यात सोयाबीनच्या पेरणीखाली मोठे क्षेत्र असून यंदा सोयाबीन बियाण्यांचे दर चांगलेच वधारले आहेत. १५ वर्षांवरील वाणांना शेतकऱ्यांकडून अधिक मागणी आहे. या वाणाच्या बियाण्यांमध्ये प्रति बॅग ६६० रुपये इतकी वाढ झाली, तर पाच ते १५ वर्षांच्या वाणांच्या बियाण्याचे दर ५५० रुपयांनी वधारले आहेत. ज्वारीचे पेरणी क्षेत्र तुलनेने कमी असले तरी ज्वारीला वाढलेली मागणी बघता यंदा क्षेत्रवाढीची शक्यता आहे. महाबीजने ज्वारीच्या बियाण्यांमध्ये तीस रुपयांनी वाढ केली आहे. तीस किलोच्या बॅगसाठी शेतकऱ्यांना यंदा ४९५ रुपये मोजावे लागणार आहेत. शेतकऱ्यांना एकरी तीन ते चार बॅग लागतात. मूग, उडीद व तुरीचे बियाणे दर मात्र स्थिर आहेत. मूग व उडीदच्या पाच किलो बॅगसाठी अनुक्रमे १०२५ रुपये व एक हजार रुपये मोजावे लागणार आहेत. तर तुरीच्या दोन किलोच्या बॅगसाठी ४५० रुपये इतकी किंमत द्यावी लागणार आहे. मूग व उडदाचे प्रति एकरी पाच बॅग व चार ते सहा किलो प्रति एकरी तुरीचे बियाणे लागतात. कापसाच्या बियाण्यांचे दरही यंदा गतवर्षी इतकेच आहेत. ९०० रुपये प्रति पाकीट असे दर आहेत.

महाबीजने बाजारात या वाणांचे बियाणे उपलब्ध करून दिले असून सोयाबीनचे १५ ते १७ हजार क्विंटल, तुरीचे ३५० ते ४०० क्विंटल तर उडीद व मुगाचे प्रत्येकी १०० क्विंटल बियाणे उपलब्ध केले आहेत. ज्वारी व मक्याचे बियाणे मागणीनुसार उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक संजय देशमुख यांनी सांगितले.

# भारती फुलमाळी भारतीय महिला क्रिकेट संघात

## अमरावतीच्या शिरपेचात आणखी तुरा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती-** येथील प्रतिभावान खेळाडू भारती फुलमाळी हिची भारतीय महिला क्रिकेट संघाच्या टी-२० वर्ल्ड कप संघात निवड झाली आहे. हे सामने १२ जून ते ५ जुलै दरम्यान इंग्लंड येथे होणार आहे. या निवडीमुळे संपूर्ण अमरावतीकरांमध्ये आनंद आणि अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.




भारती फुलमाळी हिला लहानपणापासूनच क्रिकेटची आवड होती. सुरुवातीला मुली क्रिकेट खेळत नसल्यामुळे तीने मुलांसोबत खेळत आपली क्षमता सिद्ध केली. २०१९ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व केल्यानंतर ती संघातून बाहेर पडली. मात्र हार न मानता तिने पुन्हा मेहनतीच्या जोरावर पुन्हा संघात स्थान मिळविले. भारतीय संघात निवड होणे हे प्रत्येक खेळाडूचे स्वप्न असते. वर्ल्ड कप मध्ये देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याने मी आनंदी आहे. माझे कुटुंब, प्रशिक्षक या सर्वांनी दिलेल्या पाठिंबामुळेच मला पुढे जाता आले. आता वर्ल्ड कप स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करण्याचा माझा पूर्ण प्रयत्न असेल. तिचे वडील श्रीकृष्ण फुलमाळी हे शिक्षक आहे. त्यांचे प्रोत्साहन आणि आई व दोघी बहिणी पाठीशी असल्यामुळे मी क्रिकेटमध्ये ओळख निर्माण करू शकली, असे तिने सांगितले.

# निवासी अतिक्रमण नियमानुकूल होणार

## पाचशे चौरस फुटांपर्यंत शुल्क नाही, अर्ज मुदत ३१ डिसेंबर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६परतवाडा,** शासनाकडून गरीब व गरजू नागरिकांच्या निवासाच्या प्रश्नाला दिलासा देण्यासाठी शासकीय जमिनीवरील अतिक्रमणांना नियमितीकरण करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. पाचशे चौरस फुटांपर्यंत कोणतेही शुल्क लागणार नसून ३१ डिसेंबरपर्यंत अर्जाची मुदत राहणार आहे. एक जानेवारी २०११ पर्यंतचे अतिक्रमण नियमित होणार आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४०, ५२ व ६४ तसेच संबंधित नियमांनुसार हा निर्णय घेण्यात आला असून अचलपूर उपविभागातील चांदूरबाजार, अचलपूर तालुक्यात याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व उपविभागीय अधिकारी अचलपूर तसेच तहसीलदार अचलपूर, चांदूरबाजार यांच्या नियंत्रणाखाली ग्रामीण व नागरी भागातील शासकीय जमिनीवरील निवासासाठी केलेली अतिक्रमणे नियमित करण्यासाठी मोहीम राबविण्यात येत आहे. अर्जप्रक्रिया पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज ग्रामीण भागात ग्रामविकास अधिकाऱ्यांकडे, तर नागरी भागात नगरपालिका येथे सादर करावा लागणार आहे. नागरिकांच्या काही तक्रारी, अडचणी व शंका असल्यास त्यांनी तहसीलदार सुदर्शन शहारे किंवा उपविभागीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असेही महसूल विभागाकडून सांगण्यात आले आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ डिसेंबर निश्चित करण्यात आली आहे. या मुदतीत अर्ज केलेल्या पात्र अतिक्रमणधारकांना संरक्षण मिळणार असून, त्यानंतर उशिरा अर्ज करणाऱ्यांवर कारवाई होण्याची शक्यता आहे. सर्व पात्र नागरिकांनी वेळेत अर्ज करावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी केले आहे. तथापि, नद्या, नाले, सार्वजनिक रस्ते, वनजमीन, भूस्खलन प्रवणक्षेत्र तसेच वेटलँड/सीआरझेड क्षेत्रातील अतिक्रमणांना नियमितीकरणाचा लाभ दिला जाणार नाही.

# महावितरण अमरावती परिमंडळाची उल्लेखनीय कामगिरी

## ४१ हजार ६९० नवीन वीज जोडण्या, वितरण हानीतही घट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६ अमरावती,**

महावितरणच्या अमरावती परिमंडळाने मुख्य अभियंता अशोक साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक वर्ष २०२४- २५ च्या तुलनेत वर्ष २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. वीज जोडण्या देणे, वितरण हानी कमी करणे आणि शंभर टक्के वीजबिल वसुली या महत्त्वाच्या निकषांवर उत्कृष्ट कामगिरी केली आहे. एवढेच नाही तर मार्च २०२५ च्या थकबाकीपेक्षा मार्च २०२६ ची थकबाकी कमी करणाऱ्या राज्यातील तीन परिमंडळापैकी अमरावती परिमंडळ एक असून ही अभिमानाची बाब आहे.

ग्राहकाभिमुख उपक्रमांतर्गत अमरावती परिमंडळात कृतिमानकांनुसार ४१ हजार ६९० नवीन वीज जोडण्या देण्यात आल्या. ही संख्या गेल्या वर्षाच्या तुलनेत १४ हजार ९४६ ने अधिक आहे. पीएम सूर्यघर मोफत योजनेअंतर्गत ३१ हजार ३७५ ग्राहकांच्या घरांच्या छतांवर सौर यंत्रणा बसविण्यात आली असून, मागील वर्षी ही संख्या १२ हजार ५२७ होती.तांत्रिक सुधारणा राबविताना तांत्रिक व वाणिज्यिक हानीत ८.५४ टक्क्यांनी घट झाली असून ती सध्या २१.२६ टक्क्यांवर आली आहे. वितरण हानीतही ०.७० टक्क्यांची घट झाली आहे. वीज चोरी रोखण्यासाठी राबविण्यात




आलेल्या मोहिमेत ६,४२२ प्रकरणे उघडकीस आणण्यात आली असून त्यातून २० कोटी ७५ लाख रूपयाचे दंड लावण्यात आले आहे.परिमंडळाने गेल्या वर्षभरात १०० टक्के वीजबिल वसुली साध्य करत मार्च २०२५ मधील थकीत बिलांमधून १९ लाख रुपयांची घट केली. बिलिंग कार्यक्षमतेत ३ टक्क्यांची वाढ झाली असून महसूल कार्यक्षमता १०० टक्क्यांवर पोहोचली आहे. सध्या बिलिंग कार्यक्षमता ८६ टक्के आहे.तसेच, निरूपयोगी साहित्याच्या लिलावातून २.५१ कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळविण्यात परिमंडळाला यश आले आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला गती देत ३१३ मेगावॅट क्षमतेचे ७० सौर प्रकल्प उभारण्यात आले असून, त्यामुळे परिमंडळातील सुमारे ६० टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होऊ लागली आहे. त्याचबरोबर परिमंडळात ४ लाख १९ हजार ५४६ मीटर लावण्यात आले असून आगामी काळातही अनेक ग्राहकाभिमूख बदल होणार असल्याचे मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी वर्षपूर्तीनिमित्त (दि.५ मे ) स्पष्ट केले.

# इयत्ता १२ वी पुरवणी परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६ अमरावती,**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे तर्फे घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) जून-जुलै २०२६ पुरवणी परीक्षेसाठी आवेदनपत्रे ऑनलाईन पद्धतीने भरण्याचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेचा निकाल दि. २ मे २०२६ रोजी ऑनलाईन जाहीर झाल्यानंतर ही पुरवणी परीक्षा जून-जुलै २०२६ मध्ये घेण्यात येणार आहे. पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत विद्यार्थी तसेच खढख विषय घेणारे विद्यार्थी यांना या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करता येणार आहे.

विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची अधिकृत वेबसाइट ु.ारहरहीललेरीव.ळप वर भरावीत, असे




पुणे राज्य मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.नियमित शुल्कासह आवेदनपत्र भरण्याची मुदत ५ ते १५ मे २०२६ असून, विलंब शुल्कासह १६ ते २० मे २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहे. महाविद्यालयांनी ठढऋड/छएऋढ द्वारे परीक्षा शुल्क २१ मे पर्यंत जमा करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांची यादी व प्रिलिस्ट २५ मे पर्यंत विभागीय मंडळाकडे सादर करावी लागणार आहे.अर्ज सबमिट केल्यानंतर महाविद्यालयांना 'कॉलेज लॉगिन'मधून प्रिलिस्ट उपलब्ध होणार असून, त्याची पडताळणी करून विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे आवश्यक राहणार आहे. तसेच प्राचार्यांनी प्रत्येक पानावर शिक्का व स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे.ऑनलाईन अर्ज भरताना फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेत अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची माहिती स्वयंचलितपणे उपलब्ध होणार आहे. श्रेणीसुधार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना सलग तीन संधी (जून-जुलै २०२६, फेब्रुवारी-मार्च २०२७, जून-जुलै २०२७) दिल्या जाणार आहेत.

शुल्क भरण्यासाठी खउखउख बँकेच्या व्हर्च्युअल खात्यात छएऋढ/ठढऋड द्वारेच रक्कम जमा करावी लागणार असून, जुन्या बँक चलनांचा वापर करता येणार नाही. तसेच रोख स्वरूपात शुल्क स्वीकारले जाणार नाही.विहित शुल्क न भरल्यास विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध करून दिली जाणार नाहीत. तसेच अर्ज भरण्याच्या मुदतीत कोणतीही वाढ दिली जाणार नसल्याचे मंडळाचे सचिव डॉ. दिपक माळी यांनी स्पष्ट केले आहे.

# जिल्ह्यात शेती मशागतीला आला वेग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.६अमरावती** -अमरावती जिल्ह्यातील सर्वच तालुक्यासह परिसरात यंदाच्या हंगामासाठी शेतकर्!यांनी मशागतीच्या कामांना जोरदार सुरवात केली आहे. शेतात चांगली लगबग दिसून येत आहे. शेतातील काडी कचरा



जाळने, धूरे जाळणे आदींसह नागरटी वेगाने सुरु आहे. शेतातील काडीकचरा वेचणीही सुरु झालेली आहे. ट्रॅक्टरच्या साहाय्याने आधुनिक पद्धतीने मशागत केली जात असल्याने कामाचा वेग वाढला आहे. यामुळे कमी वेळेत अधिक क्षेत्राची मशागत करणे शक्य होत आहे. काही शेतकरी अजूनही पारंपरिक बैलगाडी व बैलजोडीच्या साहाय्याने मशागत करताना दिसत आहेत. यंदा पेरणीसाठी सोयाबीन, कापूस, तूर आदी पिकांची तयारी शेतकरी करत असून कृषी विभागाकडून सुधारित बियाण्यांचा वापर, माती परीक्षण आणि योग्य खत व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन दिले जात आहे. दरम्यान, डिझेल दरवाढ आणि मशागतीच्या खर्चात वाढ ही शेतकऱ्यांसाठी चिंतेची बाब ठरत असली तरी चांगल्या पावसाच्या अपेक्षेने शेतकरी उत्साहाने कामाला लागले आहेत. यामुळे येणार्!या खरीप हंगामासाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# चांदुर बाजार रोडवरील नवीन अकोला परीसरात धाड

## बनावट साबण, डिटर्जंट कारखान्याचा पर्दाफाश, ७१ लाख रुपयांचा माल जप्त

### ४ आरोपींना अटक किरकोळ विक्रेत्यांना बनावट मालाची विक्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती–** गुन्हे शाखेच्या पोलिसांनी बनावट साबन, आणि डिटर्जेंट बनवणाऱ्या शहरातील २ अवैध कारखान्यावर धाड टाकत मोठापर्दाफाश केला. याकारवाईत ७१ लाख २० हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला असून चार आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. वलगांव पोलिस स्टेशन अंतर्गत चांदूर बाजार रोड स्थित नवीन अकोला परीसरात ही धक्कादायक कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे शहरातील लहान-मोठ्या व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आरोपीहाबनावटकारखाना चालवत होते आणिकिरकोळविक्रेत्यांना बनावटमालविकत होते.

प्राप्त माहितीनुसार, पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या सूचनेनुसार शहरातील अवैध व्यवसायांवर सातत्याने कारवाई सुरू आहे. मंगळवारी रात्री गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनावलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चांदूर बाजार रोडवरील नया अकोला परिसरात बनावट साबण आणि डिटर्जंटची अवैध निर्मिती होत असल्याची माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे, पथकाने छापा टाकून दोन अवैध कारखाने उध्वस्त केले. घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात तयार साबन, डिटर्जेंट पावडर, माल, कच्चा माल आणि यंत्रसामग्री जप्त करण्यात आली. पोलीस आयुक्त राकेश ओला, डीसीपी गणेश शिदे, शाम घुगे, रमेश धुमाळ आणि एसीपी शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पीआय संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मनीष वाकोडे, पोलीस निरीक्षक सतीश देशमुख, मंगेश लोखंडे, गजानन थेवले, मनोज ठोसर, प्रशांत मोहोड आणि विशाल वाकपंजर यांनी ही कारवाई केली.तपासात असे उघड झाले आहे की, आरोपींकडे असा कारखाना चालवण्यासाठी वैध परवाना नव्हता.परवान्याशिवाय चालणाऱ्यायबेकायदेशीर कारखान्याने अंदाजे गेल्या महिन्यात काळाबाजाराचे सत्र सुरू होते.एका गुप्तमाहितीच्या आधारे पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. सध्या असे समजले आहे की, संबंधित बँड कंपन्यांचे अधिकारी अमरावती येवून गोळा केलेल्या नमुन्यांची तपासणी करतील. यानंतर, आरोपींवर अधिक कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे. हा बनावट माल कुठून आणला जात होता आणि कोणत्या बाजारपेठांमध्ये त्याचा पुरवठा केला जात होता, याचा तपास पोलीस आता करत आहेत.

**चार आरोपींची नावे जाहीर**

या प्रकरणात पोलिसांनी चार आरोपींना अटक केली आहे. जुनैद खान यासीन खान (२८, पाकिझा कॉलनी), प्रफुल्ल विष्णुपंत डोईफोडे (४८, न्यू म्हाडा कॉलनी), शेख भुरू शेख मुनीर (५०, झेंडा चौक) आणि शेख कलीम शेखमाजीद (४०, बिस्मिल्लानगर, लालखडी) यांना ताब्यात घेण्यात आले आहे.



## बाजार समितीत सोयाबीन ६३६१ तर कापसाला ८८०० रु. भाव

**वाढलेल्या दरांचा लाभ शेतकऱ्यांना कमी व व्यापाऱ्यांना अधिक**



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**
खरीप हंगामाचा काळ जवळ आला असताना काही दिवसातच शेतकरी बि-बियाण्याची खरेदी करतात. नेमका खरीप हंगामास प्रारंभ होत असताना बाजारात आता सोयाबीन ६३६१ रु. व कापूस ८८०० रु. पोहचून दरांमध्ये मोठी वाढ झाली आहे. सरत्या हंगामात या दोन्ही पिकांना मिळालेला हा सर्वांतमहत्तम दर आहे. दरम्यान, या वाढलेल्या दरांचा लाभ शेतकऱ्यांना कमी व व्यापाऱ्यांना अधिक मिळाला आहे. सोयाबीनमध्ये झालेली दरवाढ बियाण्यांसाठी कंपनीचे प्रतिनिधी उतरल्याने वधारल्याचे सांगण्यात येत आहे. मंगळवारी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीनला ५९०० ते ६३६१ रुपये प्रति क्विंटल दर मिळाला, तरकापसाला आठ हजार ६०० ते ८८०० रुपये भाव खरेदीदारांनीदिलेत. हमीदराच्या तुलनेत हे दर सर्वाधिक आहेत. वर्ष २०२५ च्या खरीप हंगामात सोयाबीनला पाच हजार रुपये हमीदर जाहीर करण्यात आला होता, याच दराने शासकीय खरेदीही करण्यात आली. खुल्या बाजारात सोयाबीनला हमीदरापेक्षा कमी दर असल्याने शासकीय खरेदीस चांगला प्रतिसाद मिळाला असला तरी निर्धारित लक्षांकामुळे शेतकऱ्यांना त्याचा फार लाभमिळाला नाही. कापसाचीही सीसीआयच्या माध्यमातून खरेदी करण्यात आली.

शासकीय खरेदी बंद झाल्यानंतर शेतमालाचे दर वधारतील, अशी अपेक्षा होती. मात्र हंगाम आटोपत आला असताना व नवीन हंगामास प्रारंभ होत असताना सोयाबीन आणि कापसाचे दर वधारलेत. वधारलेल्या दरांचा शेतकऱ्यांना कितपत लाभ मिळतो, हा प्रश्न मात्र कायम आहे.

## धावत्या बसमध्ये दागिने चोरताना रंगेहाथ पकडले

**आरोपीला लोकांकडून चांगलाच प्रसाद**

**खोलापूर बस स्टॉपवरील घटना**



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६खोलापूर** :अंजनगाव परिसरातील खोलापूर बस स्टॉपवर एका महिला प्रवाशाच्या बॅगेतून सोने चोरण्याचा प्रयत्न करणाऱ्यास रंगेहात ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर लोकांनी चोराला बेदम मारहाण केली. पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना सोमवारी घडली. तक्रारदार, संध्या रामेश्वर सावरकर (४८, कोकी, अंजनगाव), बसने प्रवास करत असताना आरोपी, रामनिवास सुरजीत (४१, दयाल सिग कॉलनी, हरियाणा), याने धावत्या बसमध्ये त्यांच्या बॅगेतून सोने चोरण्याचा प्रयत्न केला. संशय आल्याने, महिलेने तात्काळ सतर्कता दाखविल्याने चोरट्याचा प्रयत्न फसला. महिलेने आरडाओरडा करताच, लोकांनी चोराला रंगेहाथ पकडले. त्यानंतर बसमधील प्रवाशांनी त्याला बेदम मारहाण करून पोलिसांच्या ताब्यात दिले. महिलेच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, गेल्या अनेक दिवसांपासून बस मधील प्रवाशांना लक्ष्य करून लाखो रुपयांच्या दागिन्यांच्या चोरीच्या घटना दररोज घडत आहेत. ताब्यात घेतलेल्या आरोपीची कसून चौकशी केली जात आहे, ज्यामुळे चोरांच्या एका नवीन टोळीचा पर्दाफाश होऊ शकतो.

## मेळघाटात बुद्ध पौर्णिमेच्या लख्ख प्रकाशात 'निसर्ग अनुभव'

**३३ वाघ, शेकडो वन्यजीवांचे पर्यटकांना दर्शन**





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती** निसर्ग प्रेमी ज्या गोष्टीची आतुरतेने वाट पाहत होते, असा 'निसर्ग अनुभव' उपक्रम १ मे २०२६ रोजी बुद्ध पौर्णिमेच्या पर्वावर मेळघाट व्याघ्र प्रकल्पात उत्साहात पार पडला. पौर्णिमेच्या लख्ख चांदण्यात सलग १२ तास घनदाट वनातील २६४ मचाणांवर रात्रभर बसून पाणवठ्यावर येणाऱ्यावन्यप्राण्यांच्यानिरीक्षणाचा थरारक अनुभव निसर्गप्रेमींनी मनमुरादपणे लुटला. मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत अकोट, गुगामल, सिपना, मेळघाट वन्यजीव, अकोला आणि पांढरकवडा या सहा वन्यजीव विभागांमध्ये हा उपक्रम राबवण्यात आला होता. या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, यवतमाळ, औरंगाबाद, अकोला, अमरावती या जिल्ह्यांसह मध्य प्रदेश आणि तेलंगणा राज्यातूनही पर्यटकांनी मोठ्या संख्येने गुगल फॉर्मद्वारे नोंदणी केली होती.

या रोमांचक मोहिमेत मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या ख्य क्षेत्रात ३० वाघ, १६ बिबट, ११० अस्वल, ४१३ नगवा, ८५६ सांबर आणि १२१ नीलगाय या न्यजीवांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. तसेच पांढरकवडा यजीव विभागात ३ वाघ, २ बिबट, १६४ रानडुक्कर, अस्वल, ६७ नीलगाय व १५३ चितळ दिसून आले. कोला वन्यजीव विभागातही १६ बिबट, २५ अस्वल, २ तडस, २३ कोल्हा, ६० रानडुक्कर, २०२ चितळ आणि ३६५ नीलगाय असे वैविध्यपूर्ण वन्यजीव पर्यटकांच्या दृष्टीस पडले. मचाणावर बसण्यापूर्वी संबंधित वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांनी पर्यटकांना आवश्यक सूचना दिल्या होत्या आणि प्रत्येक निसर्गप्रेमीसोबत सुरक्षेसाठी वन कर्मचारी व निरीक्षणासाठी पत्रक देण्यात आले होते. रात्रीच्या वेळी जंगलात शांतता, रातकिड्यांची किरकिर आणि हवेची झुळूक अशा नैसर्गिक वातावरणात वन्यजीवांना जवळून पाहणे, हा पर्यटकांसाठी एक विलोभनीय अनुभवठरला. पौर्णिमेच्या प्रकाशात उजळलेले मेळघाटचे घनदाट जंगल आणि प्राण्यांचे आवाज यामुळे सहभागी पर्यटक भारावून गेले होते. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने केलेल्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल आणि वनविभागाच्या सहकार्याबद्दल पर्यटकांनी समाधान व्यक्त करत, वाघांना वइतर वन्यजीवांना नैसर्गिक अधिवासात अनुभवल्याचा विशेष आनंद व्यक्त केला आहे.

## विद्यार्थिनींनी पदवीसोबतच कौशल्य आत्मसात करावे

**कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांचे प्रतिपादन**



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**
अमरावती येथील नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या महिला महाविद्यालयाचा पदवी वितरण समारंभ नुकताच पार पडला. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी विद्यार्थिनींना पदवीसोबतच कौशल्ये आत्मसात करण्याचे आवाहन केले. सध्याच्या धकाधकीच्या काळात केवळ शिक्षणाच्या आधारे नोकरी मिळवणे कठीण झाल्याचे त्यांनी नमूद केले.

या समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. असनारे उपस्थित होते. नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे ज्येष्ठ उपाध्यक्ष डॉ. सुभाष कसबेकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले.

डॉ. अविनाश असनारे यांनी गुणवत्ताप्राप्त विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. मुलींवर सासर आणि माहेर अशा दोन्ही कुळांची जबाबदारी असते, तसेच त्यांना पुढची पिढी घडवायची असते, त्यामुळे समाजात वावरताना या जबाबदारीचे भान ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. असनारे यांनी महाविद्यालयाशी आपला जुना ऋणानुबंध असल्याचे सांगत शैक्षणिक परंपरेचे कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. सुभाष कसबेकर यांनीही सर्व विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर यांनी पदविका प्राप्त करणाऱ्या सर्व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. प्रा. मधुरा ठाकरे यांनी दीक्षांत संदेशाचे वाचन केले. विद्यापीठ गीत व महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला, त्यानंतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या विविध शाखांमधील स्नातक व पदव्युत्तर विभागातील गुणानुक्रमे पहिल्या तीन विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते पदवी व सुवर्णपदके प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शर्मिला देशमुख यांनी केले, तर प्रा. डॉ. जयश्री वैष्णव यांनी आभार मानले. कोमल ढोके व श्रावणी भडके या विद्यार्थिनींच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## मे महिन्याच्या ग्रामसभेत जनगणना, पाणीटंचाईवर होणार चर्चा

**सीईओ गांधींनी परिपत्रक काढले, स्व-गणनेवर विशेष लक्ष**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती** – जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) सत्यम गांधी यांनी मे महिन्यात जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा घेण्याचे निर्देश दिले आहेत. या ग्रामसभांमध्ये जनगणना आणि संभाव्य पाणीटंचाई या दोन महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा केली जाणार आहे. पंचायत विभागामार्फत हे परिपत्रक सर्वदूर पाठविण्यात आले आहे.

भारत सरकारद्वारे राबवण्यात येणाऱ्या जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्याला महाराष्ट्र दिनापासून सुरुवात झाली आहे. नागरिकांना 'स्व-गणना' करण्याचा आणि तीही ऑनलाईन पद्धतीने करण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामुळे ग्रामसभांमध्ये या प्रक्रियेबद्दल नागरिकांना सविस्तर माहिती दिली जाईल आणि जास्तीत जास्त लोकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले जाईल. यामुळे जनगणना प्रक्रिया अधिक सुलभ, जलद व पारदर्शक होण्यास मदत होईल.

याशिवाय, मान्सूनपूर्व काळात उद्भवणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याची उपलब्धता हा मुद्दाही ग्रामसभेत चर्चेला येणार आहे. गावामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची आवश्यकता आहे की नाही, याबाबत ग्रामसभेत ठराव घेण्यात येतील आणि त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल. सीईओंच्या मते, ग्रामसभांमधून स्थानिक गरजांचा आढावा घेऊन नागरिकांच्या सहभागातून ठोस निर्णय घेतले जावेत.

पूर्वी मे महिन्याच्या पहिल्या दिवशी येणाऱ्या महाराष्ट्रदिनी सर्वच ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा घेतली जायची. मात्र, आता १ मे ऐवजी सोयीनुसार त्या-त्या ग्रामपंचायतींनी मे महिन्यात केव्हाही ग्रामसभा घ्यावी, असा बदल करण्यात आला आहे. सीईओंच्या परिपत्रकातही तसा उल्लेख करण्यात आला आहे. २६ जानेवारी, १५ ऑगस्ट आणि २ ऑक्टोबर या दिवशीच्या ग्रामसभा मात्र निर्धारित दिवशीच होतील.

## अमरावती महानगरपालिका सीड बॉल तयार करणार

**बिया उपलब्ध करून देण्याचे अमरावतीकर नागरिकांना आवाहन**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ अमरावती**
अमरावती शहर हरित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनविण्याच्या दृष्टीने अमरावती महानगरपालिकेकडून सीड बॉल तयार करण्याचा उपक्रम हाती घेण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत देशी वृक्षांच्या बियाण्यांपासून सीड बॉल तयार करून त्यांचे शहरातील मोकळ्या जागांमध्ये व परिसरात विसर्जन करण्यात येणार आहे, ज्यामुळे वृक्षसंवर्धनास चालना मिळेल व पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल. नागरिकांनी आपल्या परिसरातील उपलब्ध देशी वृक्षांची बियाणे (उदा. कडुलिंब, बाभूळ, आंबा, जांभूळ, करंज इ.) गोळा करून कस्तुरबा उद्यान नेहरू मैदान येथे ७ ते १९ मे रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत आणून देण्याचे आवाहन अमरावती महानगरपालिकेने केले आहे. बियाणे स्वच्छ, कोरडी व रोगमुक्त असावीत. शक्यतो देशी व स्थानिक प्रजातींची बियाणेच जमा करावीत.

बियाणे वेगवेगळ्या पिशव्यांमध्ये /पॅकेटमध्ये व्यवस्थित पॅक करून त्यावर वृक्षाचे नाव नमूद करावे. नागरिकांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी होईल व अमरावती शहर अधिक हिरवेगार करण्यास मदत होईल, असा विश्वास महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी व्यक्त केला आहे.

## मतदार यादीचे काम करणाऱ्यास मारहाण

विदर्भ प्रजासत्ताकदि.६अमरावती:मतदार यादीचे सर्वेक्षण करण्यासाठी गेलेल्या कर्मचाऱ्याला मार खावा लागल्याची घटना गाडगेनगर पोलिस्-गांच्या हद्दीत कांतानगर येथे मंगळवारी घडली. शासकीय तंत्रनिकेतन मध्ये निदेशक म्हणून काम करणाऱ्या सुरेश सोनाजी लोखंडकर (वय ४७, रा सिध्दी विनायकनगर) यांची मतदार यादीच्या मॅपींगची डयुटी लावण्यात आली आहे. याअंतर्गत मंगळवारी सकाळी ९ वाजता ते कांतानगर येथे डीजी रेसीडेन्सीमध्ये सर्वेक्षणासाठी गेले होते. तेथे एका फ्लॅटमध्ये महिलेकडून माहिती घेत असताना, तिचा पती आला आणि पत्नीशी काय बोलतो, असे म्हणत शिविगाळ करुन मारहाण केली. तसेच त्यांच्या वाहनाला धक्का देऊन अंदाजे पाच हजार रुपयांचे नुकसान केले. याप्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी लोखंडकर यांच्या फिर्यादीवरुन आरोपी विनोद पांडुरंग भावे याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.–

# अमरावतीत कंत्राटदारांचे ठिय्या आंदोलन

## १८.८१ कोटींची देयके रखडली

### जलपुरवठा कामांवर परिणाम होण्याची शक्यता प्रशासनाच्या आश्वासनांवर प्रश्नचिन्ह



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

अमरावती येथे मजीप्रा जलव्यवस्थापन विभागाच्या कार्यालयासमोर कंत्राटदार असोसिएशनने बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. सुमारे १८.८१ कोटी रुपयांची प्रलंबित देयके अद्यापही न मिळाल्यामुळे संतप्त झालेल्या कंत्राटदारांनी हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. असोसिएशनच्या माहितीनुसार, सन २०२४-२५ मधील ३.५० कोटी रुपये आणि सन २०२५-२६ मधील १५.३१ कोटी रुपये अशी एकूण १८.८१ कोटी रुपयांची देयके प्रलंबित आहेत. या निधीची मागणी मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालयाकडे करण्यात आली असली, तरी अद्याप निधी वितरित झालेला नाही. परिणामी कंत्राटदारांची आर्थिक स्थिती डबघाईस आली असून कामकाजावर गंभीर परिणाम होत आहे.यापूर्वी १ एप्रिल २०२६ पासून पाणीपुरवठा कामे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र विभागाकडून एप्रिल महिन्यात निधी मिळेल, असे आश्वासन देण्यात आल्याने आंदोलन मागे घेण्यात आले होते. त्यानंतरही १५ एप्रिलपर्यंत देयके देण्याची मागणी करण्यात आली होती. पुढे मुंबई येथे झालेल्या बैठकीत ८ ते १० दिवसांत निधी वितरित होईल, असे पुन्हा आश्वासन देण्यात आले. मात्र एप्रिल महिना संपूनही प्रत्यक्षात कोणतीही देयकांची पूर्तता झालेली नाही.या पार्श्वभूमीवर ६ मेपासून कंत्राटदारांनी बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. देयके तात्काळ अदा न झाल्यास पाणीपुरवठा योजनांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन तोडगा काढावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

# ‘प्रहार’ पक्ष विलीन झाला, पण संघटना कायम; - आ.बच्चू कडू

## कार्यकर्त्यांची आता होणार राजकीय आणि सामाजिक विभागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६ नागपूर-** विधान परिषदेची उमेदवारी मिळवण्यासाठी बच्चू कडू यांनी प्रहार जनशक्ती पक्ष शिवसेना (शिंदे गट) मध्ये विलीन केला आहे. मात्र प्रहार संघटना कायम राहणार असून, कार्यकर्त्यांची सामाजिक व राजकीय कामांमध्ये विभागणी करण्यासाठी लवकरच बैठक आयोजित करण्यात येणार आहे. यासंदर्भात त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

सामाजिक व राजकीय कार्याची विभागणी

बच्चू कडू यांनी सांगितले की, काही सदस्य राजकारणात काम करणार नाहीत, तर सामाजिक कार्यात सक्रिय राहतील. अशा लोकांनी प्रहार संघटनेत सामाजिक उपक्रमात सहभाग घ्यावा. ज्यांना राजकारणात सक्रिय राहायचे आहे, त्यांना शिवसेना पक्षातून संधी मिळेल. संघटनेच्या माध्यमातून समाजावर अधिक प्रभाव निर्माण करण्यावर भर दिला जाईल.

सामाजिक कार्याद्वारे प्रहार संघटनेला स्थानिक स्तरावर ताकद मिळेल, तसेच सदस्यांच्या अनुभवांचा उपयोग करून राजकीय उद्दिष्ट साध्य करता येईल. बच्चू कडू म्हणाले, शिवसेनेकडून कोणतीही अटी लादण्यात आलेल्या नाहीत, परंतु आमच्याकडे वीस-पंचवीस वर्षांचा अनुभव आहे. संघटनेत काम करणाऱ्या प्रत्येकाला त्यांच्या इच्छेनुसार कामाची दिशा दिली जाईल.

प्रहार संघटनेची बैठक प्रत्येक विभागाची कामकाज पद्धत, चुका, आणि सुधारणा यावर लक्ष देईल. यासोबत शेतकरी संवाद यात्रा आयोजित करण्याबाबत निर्णय घेतला जाईल. या यात्रेत शेतकऱ्यांच्या समस्या, अपंग आणि मजुरांसंबंधी मुद्दे समाविष्ट असतील.

बच्चू कडू यांनी सांगितले की, ही यात्रा शिवसेना पक्षाच्या धोरणात्मक उपक्रमांसह समाजाशी थेट संवाद साधण्याचा मार्ग बनेल. या यात्रेत मंत्री आणि एकनाथ शिंदे यांचा सहभाग असण्याची शक्यता आहे. यामुळे संघटनेचा प्रभाव वाढेल व स्थानिक पातळीवर मजबूत संदेश जाईल.

बच्चू कडू यांनी शेतकरी व अपंगांकडे मंत्रालयाने अधिक लक्ष देण्याची गरज स्पष्ट केली. प्रहार संघटनेच्या माध्यमातून समाजासाठी सकारात्मक बदल घडवण्याची तयारी आहे. संघटनेचा उद्देश सामाजिक कार्य आणि राजकारण यांमधील संतुलन राखणे व समाजाशी जोडून धोरणात्मक योजना राबवणे आहे. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली प्रहार संघटना सामाजिक व राजकीय कामकाजात विभागणी करून संघटनेची ताकद अधिक प्रभावी करण्याच्या दिशेने वाटचाल करण्याचा प्रयत्नात आहे.

# थंडपेयात वापरण्यात येणारा बर्फ आरोग्यासाठी शुद्ध की अशुद्ध?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती-** उन्हाळ्याची तीव्रता वाढत असून शहरासह ग्रामीण भागात थंडपेय, ज्यूस, लिंबू शरबत, लस्सी, मठा, आदी पेयांना मोठी मागणी वाढली आहे. मात्र, या थंडपेयांमध्ये वापरण्यात येणारा बर्फ शुद्ध आहे की अशुद्ध, असा गंभीर प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अनेक ठिकाणी थंडपेय विक्रेते कोणत्याही तपासणीशिवाय व निकृष्ट दर्जाच्या पाण्यापासून तयार केलेला बर्फ वापरतात, यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. काही ठिकाणी बर्फ तयार करताना फिल्टर केलेले किंवा शुद्ध पाणी न वापरता साध्या नळाचे पाणी किंवा बोअरवेलच्या पाण्याचा वापर केला जातो. तसेच बर्फ साठवण्याची व वाहतूक करण्याची पद्धतही अत्यंत अस्वच्छ असल्याचे दिसून येते. उघड्यावर ठेवलेला बर्फ, घाणेरड्या गोणपाटात किंवा प्लास्टिकमध्ये वाहतूक होत असल्याने त्यावर धूळ, माती व जंतूंचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा अशुद्ध बर्फामुळे नागरिकांना पोटदुखी, उलट्या, जुलाब, टायफाईड, यांसारखे आजार होण्याचा धोका वाढतो. विशेषतः लहान मुले, वृद्ध व आजारी व्यक्तींना याचा मोठा फटका बसू शकतो.


**प्रशासनाने तपासणी करावी -** नागरिकांनी थंडपेय घेताना त्यात वापरण्यात येणार्‍या बर्फाबाबत विचारणा करावी तसेच स्वच्छतेची खात्री करूनच पेय घ्यावे, यामुळे आरोग्य जपता येईल. अन्न व औषध प्रशासन तसेच स्थानिक नगर परिषद आरोग्य विभागाने शहरातील बर्फ कारखाने व थंडपेय विक्रेत्यांची तपासणी करून निकृष्ट व अस्वच्छ बर्फ वापरणार्‍यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. उन्हाळ्यात थंडावा मिळवताना आरोग्य धोक्यात येणार नाही, याची काळजी नागरिकांनी घेणे गरजेचे आहे.

## उन्हाळ्यात वाढली बर्फाला मागणी

# व्यावसायिक सिलिंडर दरवाढीचा स्फोट चायनिज पदार्थासह नाश्ताही महागला!

## चार महिन्यांत १३८० रुपयांची वाढ ग्राहकांच्या खिशाला कात्री

## महिन्याचे बजेट कोलमडले, हॉटेलचे जेवण महागले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात १ मेपासून तब्बल ९९३ रुपयांची वाढ झाल्याने जिल्ह्यातील खाद्य व्यवसायात खळबळ उडाली आहे. गेल्या चार महिन्यांत एकूण १३८० रुपयांची वाढ झाल्याने हॉटेल, नाश्ता सेंटर, चहा टपऱ्या आणि चायनिज फास्टफूड व्यावसायिकांचे कंबरडे मोडण्याची वेळ आली आहे. दरवाढीचा थेट परिणाम खाद्यपदार्थांवर दिसू लागला असून काही हॉटेल व्यावसायिकांनी प्लेटमागे किमान ५ रुपयांची वाढ केली आहे.

चायनिज पदार्थांची प्लेट ८० रुपयांपर्यंत पोहोचली असून समोसा, आलुबर्बोडा, वडा, मिरची भजी यांसारखे नाश्त्याचे पदार्थ ३० ते ४० रुपये प्लेट दराने अमरावती शहरात विकले जात आहेत. नाश्त्यापासून ते जेवणाच्या थाळीपर्यंत सर्वच दरवाढण्याची शक्यता असून ग्राहकांच्या खिशाला मोठी कात्री बसणार आहे. सरकारी तेल विपणन कंपन्यांनी दरवाढ जाहीर केली आहे. यामध्ये इंडियन ऑइल, हिंदुस्तान पेट्रोलियम व भारत पेट्रोलियम या कंपन्यांचा समावेश आहे. आहे. अचानक झालेल्या वाढीचा सर्वाधिक फटका हॉटेल, रेस्टॉरंट, नाश्ता सेंटर व लघुउद्योजकांना बसत आहे. आधीच गॅस टंचाईचा सामना करणाऱ्या व्यावसायिकांपुढे आता वाढीव खर्चाचा मोठा बोजा उभा राहिला आहे.

लग्नसराईच्या हंगामात कॅटरिंग व्यवसायही महागणार असून बेकरी, मिठाई आणि स्नॅक्स उत्पादकांकडूनही दरवाढीचे संकेत मिळत आहेत. परिणामी, सर्वसामान्य कुटुंबाचे मासिक बजेट दोन ते अडीच हजारांनी वाढण्याचा अंदाज व्यक्त होत आहे.दरवाढ आणि टंचाई या दुहेरी संकटामुळे गडचिरोलीतील खाद्य व्यवसाय अडचणीत आला असून येत्या काळात खाद्यपदार्थांचे दर आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### मोठ्यांना पुरवठा, लहानांना प्रतीक्षा

मोठ्या व्यावसायिकांना नियमित सिलिंडर मिळत असताना लहान व्यावसायिकांना प्रतीक्षा करावी लागत असल्याची अनेकांची तक्रार आहे. यामुळे छोट्या व्यवसायांवर सर्वाधिक परिणाम होत आहे.

# आपले सरकार’ सेवा केंद्रांवर क्यूआर कोड सक्तीचा

## अवाजवी शुल्कावर लागणार लगाम

**विदर्भ प्रजासत्ताकदि.६ अमरावती**

११विविध दाखले, प्रमाणपत्रे आणि ऑनलाइन सेवांसाठी नागरिकांकडून अवाजवी शुल्क आकारणीच्या वाढत्या तक्रारींची गंभीर दखल घेत राज्य शासनाने ‘आपले सरकार सेवा केंद्रां’संदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता राज्यातील सर्व सेवा केंद्रांवर सुधारित दरफलकासह क्यूआर कोड लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. या नव्या व्यवस्थेमुळे नागरिकांना सेवा शुल्क, अधिकृत सेवांची यादी, तक्रार नोंदणी आणि अभिप्राय देण्याची सुविधा थेट मोबाईलवर उपलब्ध होणार आहे.शासनाच्या निर्देशानुसार, प्रत्येक ‘आपले सरकार’ सेवा केंद्राच्या दर्शनी भागावर स्पष्टपणे क्यूआर कोड लावणे बंधनकारक राहणार आहे. संबंधित क्यूआर कोड स्कॅन केल्यावर नागरिकांना त्या केंद्रात दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती आणि शासनाने निश्चित केलेले अधिकृत शुल्क पाहता येणार आहे. यामुळे नागरिकांची फसवणूक रोखणे आणि सेवा प्रक्रियेत पारदर्शकता आणणे हा मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.गेल्या काही काळात अनेक ठिकाणी प्रमाणपत्रे आणि इतर सेवांसाठी निश्चित शुल्कापेक्षा जास्त रक्कम आकारली जात असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत होत्या. देसाईगंज येथील एका सेवा केंद्राबाबतही अशीच तक्रार समोर आली होती. मात्र, नव्या क्यूआर कोड प्रणालीमुळे नागरिकांना अधिकृत दरांची थेट माहिती मिळणार असल्याने मनमानीला आळा बसण्याची शक्यता आहे.या उपक्रमांतर्गत नागरिकांना सेवा केंद्रांना रेटिंग देण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. सेवा समाधानकारक असल्यास सकारात्मक अभिप्राय देता येणार असून, त्रुटी असल्यास सूचना किंवा तक्रार नोंदविण्याची सोयही करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, एखाद्या केंद्राविषयी ५ टक्क्यांपेक्षा अधिक नकारात्मक अभिप्राय आल्यास त्या केंद्राची सखोल चौकशी केली जाणार आहे.नियमांचे उल्लंघन करणाऱ्या केंद्रांवर दंडात्मक कारवाई करण्याचाही इशारा शासनाने दिला आहे. त्यामुळे सेवा केंद्रांच्या कामकाजावर नियंत्रण येऊन नागरिकांना अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि सुलभ सेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. राज्यातील ई-गव्हर्नन्स प्रक्रियेला गती देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

### अभिप्रायासाठी कोणते क्यूआर कोड असणार ?

अभिप्राय देण्यासाठी क्यूआर कोड.
सेवा शुल्क दर्शविणारा क्यूआर कोड.
अधिसूचित सेवांची यादी.
जिल्ह्यातील केंद्रांचे ठिकाण दर्शविणारा क्यूआर कोड.
ऑनलाइन तक्रार नोंदणी सुविधा उपलब्ध आहे.-

# अनुदानावर बियाणे मिळणार, ‘महाडीबीटी’वर अर्ज केला का?

## धान, सोयाबीन अन् तुरीसाठी मिळणार अनुदान : खरीप हंगामाचे नियोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.६अमरावती**

खरीप हंगाम २०२६ चे पडघम वाजू लागले असून शेतकरी आता पेरणीच्या तयारीला लागला आहे. शेतकऱ्यांचा बियाणांवरील खर्च कमी व्हावा आणि त्यांना दर्जेदार, प्रमाणित बियाणे मिळावे यासाठी राज्य शासनाच्या कृषी विभागाने महाडीबीटी पोर्टलवर बियाणे अनुदान योजनेची प्रक्रिया सुरू केली आहे. अमरावती जिल्ह्यात सोयाबीन आणि तुरीसाठी हे अनुदान मिळणार असून, पात्र शेतकऱ्यांना याचा मोठा आर्थिक आधार मिळणार आहे.ज्या शेतकऱ्यांच्या नावे सातबारा उतारा आणि ८-अ उतारा आहे, असे सर्व अल्प, अत्यल्प भूधारक व बहुभूधारक शेतकरी या योजनेसाठी अर्ज करू शकतात. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाते.या योजनेंतर्गत पिकांच्या विविध वाणांसाठी ५० टक्के ते कमाल १०० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाते. धान, सोयाबीन, तूर, मूग आदी पिकांवर अनुदान मिळते.राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान व इतर राज्य पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रमाणित बियाणे उपलब्ध करून दिले जाते. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांनी स्वतःच्या घरचे बियाणे न वापरता सुधारित आणि अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांचा वापर करावा, हा आहे. यामुळे उत्पादकतेत वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते.महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करताना आधार क्रमांक अनिवार्य आहे. तुमचे आधार कार्ड बँक खात्याशी लिंक असणे आवश्यक आहे, कारण अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा केली जाते. ज्यांचे आधार लिंक नाही, त्यांचे अर्ज तांत्रिक अडचणीत येऊ शकतात.

### पात्रता आणि निकष काय?

अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा, सातबारावर पिकाची नोंद असणे आवश्यक, एका शेतकऱ्याला एका पिकाच्या बियाणासाठी कमाल मर्यादितच लाभ मिळतो, बियाणांची खरेदी अधिकृत कृषी केंद्र किंवा महाबीजकडून करणे बंधनकारक आहे.

### महाडीबीटीवर करा अर्ज

शेतकऱ्यांनी शासनाच्या mahadbt.maharashtra.gov.in या अधिकृत पोर्टलवर जाऊन ’शेतकरी योजना’ या पर्यायाखाली ’बियाणे’ या घटकासाठी अर्ज करायचा आहे. अर्ज करण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी असून सीएससी (उडउ) सेंटरवरून किंवा स्वतःच्या मोबाइलवरूनही अर्ज करता येईल.